




दैनिक **अक्षराज**

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com








वर्ष : ०६ | अंक : ४२, पाने : ०५, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शुक्रवार, दि.२५ सप्टेंबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# ढोल-ताशा पथकांनाही आवाजाची मर्यादा !

## पुण्यातील विसर्जन मिरवणुकीत १२० ठिकाणी ध्वनिपातळीचे होणार निरीक्षण

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२४, पुणे :** गणेश विसर्जन मिरवणुकीत ध्वनिप्रदूषण करणाऱ्या ध्वनिवर्धक यंत्रणांबरोबरच आता ढोल-ताशा पथकांच्या आवाजाचीही 'डेसिबल' तपासणी केली जाणार असून, निर्धारित मर्यादा ओलांडल्यास संबंधित पथकावरही गुन्हा दाखल केला जाणार आहे. विसर्जन मिरवणुकीच्या मार्गावर १२० ठिकाणी ध्वनिपातळीचे सातत्याने निरीक्षण केले जाणार असल्याची माहिती पोलिस आयुक्त अमितेशकुमार यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली.




गणेशोत्सव सुरू होण्यापूर्वीपासूनच पुण्यात ध्वनिप्रदूषणाचा मुद्दा चर्चेत आहे. त्यातच धार्मिक मिरवणुकांमधील ध्वनिप्रदूषणाची मुंबई उच्च न्यायालयाने स्वेच्छा दखल घेतली आहे. न्यायालयाने ध्वनिपातळीचे मोजमाप करून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कायद्यानुसार कारवाई करण्याची गरज अधोरेखित केली आहे. या वेळी सहआयुक्त संजय दराडे, अतिरिक्त आयुक्त संजय पाटील, मनोज पाटील, राजेश बनसोडे आणि तेजस्वी सातपुते उपस्थित होते.

अमितेशकुमार म्हणाले, 'विसर्जन मिरवणुकीत सहभागी होणाऱ्या गणेश मंडळांच्या ध्वनिवर्धक यंत्रणांवरही पोलिसांची करडी नजर राहणार आहे. मंडळांना चार 'टॉप' आणि चार 'बेस' स्पीकर वापरण्याची परवानगी देण्यात आली आहे. या मर्यादेपेक्षा अधिक स्पीकर वापरल्याचे आढळल्यास संबंधित मंडळाची संपूर्ण ध्वनिवर्धक यंत्रणा जप्त केली जाईल. प्लाझ्मा स्पीकर आणि मिड-प्रेशर स्पीकरच्या वापरावरही निर्बंध कायम आहेत. तसेच ढोल-ताशा पथकांकडून वापरण्यात येणाऱ्या 'टोल' या वाद्याच्या वापरावरील बंदीचीही अंमलबजावणी केली जाणार आहे. नियमांचे उल्लंघन झाल्यास केवळ सूचना देऊन कारवाई थांबवली जाणार नसून, संबंधितांवर कायदेशीर कारवाई केली जाणार आहे,' असे आयुक्तांनी स्पष्ट केले.

**दोन पथके; एका चौकात १० मिनिटे वादन**

विसर्जन मिरवणुकीदरम्यान लक्ष्मी रस्त्यावर एक मंडळाला दोन पथके लावता येणार आहेत. तसेच, ढोल-ताशा पथकांना एका चौकात कमाल दहा मिनिटे स्थिर वादन करता येणार आहे. याबाबत सर्व गणेश मंडळांनी सहमती दर्शवली आहे, अशी माहिती पोलिस आयुक्तांनी दिली.

**विसर्जन सोहळ्यासाठी महापालिकेची तयारी..**

गणपती विसर्जनासाठी महापालिकेची यंत्रणा सज्ज झाली आहे. महापालिकेच्या १५ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत एकूण ३८ घाटांची सोय करण्यात आली आहे. गणेशमूर्ती विसर्जनासाठी ५८ हौद बांधले असून, ३०५ ठिकाणी ८१२ लोखंडी टाक्यांची सोय करण्यात आली आहे. शहरात एकूण २२४ मूर्ती संकलन केंद्रे असून, तेथे दान केलेल्या मूर्ती स्वीकारल्या जात आहेत. शाडूमातीच्या गणेशमूर्ती अथवा शाडू माती संकलनासाठी सर्व क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत एकूण ४५ ठिकाणी शाडू माती संकलन केंद्रे सज्ज असतील.

# अखेर तलासरीत 'माफिया' नावाच्या कपड्यांच्या दुकानावरील बॅनर हटवला

### मनसेच्या निवेदनानंतर कारवाई; प्रसारमाध्यमांच्या वृत्ताचीही दखल

**अक्षराज : निलेश कासट**



**दि.२४, तलासरी (पालघर) :** तलासरी नगरपंचायत हद्दीतील एका कपड्यांच्या दुकानाला 'माफिया' हे नाव देण्यात आल्याच्या मुद्द्यावरून निर्माण झालेल्या वादाला अखेर पूर्णविराम मिळाला आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी याबाबत तलासरी नगरपंचायतीकडे निवेदन देऊन कारवाईची मागणी केल्यानंतर तसेच दै. अक्षराजने याबाबत वृत्त प्रसिद्ध केल्यानंतर संबंधित दुकानदारांनी दुकानावर लावलेला 'माफिया' नावाचा बॅनर हटविला आहे.

तलासरी शहरातील भर बाजारपेठेत तसेच महाविद्यालयाच्या परिसरालगत असलेल्या कपड्यांच्या दुकानाला 'माफिया' असे नाव देण्यात आल्याचे निदर्शनास आल्यानंतर मनसेकडून आक्षेप घेण्यात आला होता. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुका सचिव (रस्ते, साधन सुविधा व आस्थापना) नितेश भेलका यांनी तलासरी नगरपंचायतीच्या मुख्याधिकाऱ्यांना लेखी निवेदन देऊन संबंधित दुकानाच्या नावाची चौकशी करण्याची मागणी केली होती.

'माफिया' हा शब्द गुंडगिरी अथवा गुन्हेगारीशी संबंधित असल्याने सार्वजनिक ठिकाणी, विशेषतः बाजारपेठ आणि महाविद्यालयाच्या परिसरात अशा नावाचा वापर केल्याने नागरिकांमध्ये चर्चा निर्माण होत असल्याचे मनसेच्या निवेदनात नमूद करण्यात आले होते. संबंधित दुकानाच्या नावामागे दहशतीचे वातावरण निर्माण करण्याचा उद्देश आहे का, याची चौकशी करावी तसेच कायदेशीर बाबी तपासून आवश्यक ती कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली होती.

कारवाई न झाल्यास महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला होता.

या संपूर्ण प्रकरणाची दखल घेत दै. अक्षराजने 'तलासरीत कपड्यांच्या दुकानाला माफिया नाव; कारवाईची मनसेची मागणी' या आशयाचे वृत्त प्रसिद्ध केले होते. त्यानंतर संबंधित दुकानदारांनी दुकानावर लावलेला 'माफिया' नावाचा बॅनर हटविला आहे. त्यामुळे मनसेच्या निवेदनासह प्रसारमाध्यमांनी उपस्थित केलेल्या मुद्द्याची दखल घेण्यात आल्याचे दिसून आले.

याबाबत मनसे तालुका सचिव नितेश भेलका यांनी प्रसारमाध्यमांचे आभार मानले. समाजामध्ये दहशत निर्माण होईल किंवा नागरिकांमध्ये गैरसमज निर्माण होतील अशा पद्धतीची बॅनरबाजी कोणी करत असेल, तर त्याला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पद्धतीने उत्तर दिले जाईल, असा इशारा त्यांनी दिला.

दरम्यान, संबंधित दुकानाचा बॅनर हटविण्यात आल्याने या प्रकरणाला तूर्तास विराम मिळाला आहे. मात्र, दुकानाच्या नावाबाबत नगरपंचायतीने कायदेशीरदृष्ट्या कोणती कार्यवाही केली किंवा पुढील काळात अशा प्रकारची बॅनरबाजी होऊ नये यासाठी कोणती भूमिका घेतली जाते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# खापरखेडा मुख्य बाजारपेठ दगडी चाळ गँगवार प्रकरण !

## फरार मकोकाचा कुख्यात आरोपी संघर्ष बागडे अखेर गजाआड

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२४, नागपूर :** खापरखेडा मुख्य बाजारपेठेत घडलेल्या बहुचर्चित दगडी चाळ गँगवार प्रकरणातील मकोकाच्या गुन्ह्यात फरार असलेला कुख्यात गुन्हेगार संघर्ष बागडे(१९) इंदिरानगर झोपडपट्टी, खापरखेडा याला २२ सप्टेंबर मंगळवारला रात्री हुडकेश्वर पोलिसांच्या डीबी पथकाने अमरावती जिल्ह्यातील धानोरा येथून बेड्या ठोकल्या त्याच्यासोबत ऋषिकेश गणेश मानकर(२१) कन्हान या साथीदाराला घरफोडीच्या गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे.

खापरखेडा मुख्य बाजारपेठेत २ ऑगस्ट रोजी दगडी चाळ टोळीने दहशत माजवत गँगवार घडवून आणले होते. या घटनेनंतर पोलिसांनी टोळीचा म्होरक्या सुरज कावळे, संघर्ष बागडे, शुभम उर्फ शेरू उईके, साहिल उर्फ बुट्या बागडे यांच्यासह १३ आरोपी विरुद्ध विविध कलमांसह महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा मकोका अंतर्गत कारवाई केली होती. यातील ९ आरोपी तुरुंगात असून अल्पवयीन आरोपी बालसुधारगृहात आहेत.

मात्र मुख्य सूत्रधार सूरज कावळे, शुभम उर्फ शेरू उईके, संघर्ष बागडे, साहिल उर्फ बुट्या घटनेनंतर फरार झाले होते.




फरार असतांना संघर्ष बागडे घरफोडी गुन्ह्यात सक्रिय होता हुडकेश्वर व एमआयडीसी हिंगणा परिसरातील घरफोड्यांच्या तपासादरम्यान सीसीटीव्ही फुटेजमध्ये संघर्ष बागडे कैद झाला होता. पंधरा दिवसांपूर्वी वर्धा जिल्ह्यातही त्याने चोरी केल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती, याआधारे हुडकेश्वर पोलिसांनी मोबाईल डम्प डेटा व तांत्रिक विश्लेषणाचा आधार घेत संघर्ष बागडे हा अमरावतीच्या धानोरा भागात लपून बसला असल्याची माहिती मिळाली.

माहिती मिळताच हुडकेश्वर डीबी पथकाने अमरावती धानोरा येथे धाड टाकून संघर्ष बागडे व त्याचा साथीदार ऋषिकेश मानकर या दोघांना २२ सप्टेंबरच्या रात्री अटक केली. खापरखेडा पोलिसांच्या मकोका कारवाईत फरार असलेला आरोपी संघर्ष बागडे अखेर पोलिसांच्या जाळ्यात अडकला.

दगडी चाळ गँगवार प्रकरणात व ममोकाच्या गुन्ह्यात खापरखेडा पोलीसांना संघर्ष बागडे याची कस्टडी अपेक्षित असून खापरखेडा पोलिसानी प्रोडक्शन वॉरंटवर आणण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत.

ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनामिका मिरझापुरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संदीप जाधव, पोलीस अंमलदार संदीप पाटील, दिनेश गाडेकर, चेतन वैद्य, विजय सिन्हा, मंगेश मडावी व प्रज्वल वाणी यांच्या पथकाने केली.

# 'त्या' नरभक्षी वाघाचा तात्काळ बंदोबस्त करा : आ. विजय वडेट्टीवार




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२४, चंद्रपूर :** व्याघ्र प्रकल्प पर्यटनाच्या नावावर वन विभागामार्फत ताडोबा-अंधारी जंगलात मागील अनेक वर्षांपासून मोठ्या प्रमाणात जेरबंद केलेले वाघ सोडण्यात आले. या वाघांची संख्या आता आवाक्याबाहेर गेली असून. मानव-वन्यजीव संघर्षातून अनेकांचा नाहक बळी जात आहे. असे असताना शासन मात्र ठोस पाऊल उचलण्याऐवजी मानवी जीवाची किंमत मोजून चुप्पी साधत आहे. अशा भयावह स्थितीत जंगलालगतच्या शेतशिवारात जाणेही आता जीवावर बेतू लागले . या पार्श्वभूमीवर विधीमंडळ पक्षनेते आ. विजय वडेट्टीवार यांनी वनविभागाच्या कार्यपध्दतीवर तीव्र नाराजी व्यक्त करत नागरिकांच्या जीवांशी खेळ थांबवा. संबंधित नरभक्षी वाघाचा तात्काळ बंदोबस्त करा... अन्यथा जनतेला सोबत घेऊन तीव्र जनआंदोलन उभारु, असा इशारा दिला आहे.

सावली वनपरिक्षेत्रातील निलसनी- पेठगाव परिसरात काही दिवसांपूर्वी एका शेतकऱ्यावर वाघाने हल्ला केला. गुरे चारताना झालेल्या या हल्ल्यात त्यांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण असतानाच २१ सप्टेंबर २०२६ रोजी सामदा बुज. परिसरात हेमंत अशोक भूरसे या शेतकऱ्याचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाल्याची घटना घडली. एका पाठोपाठ एक जीव जात असताना वनविभाग नेमके काय करत आहे, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. ' नागरिकांनी शेती करायची कशी? गुरे तारायची कुठे? कुटुंबाचा उदरनिर्वाह करायचा कसा? प्रत्येक वेळी वनविभागाने केवळ गस्त वाढविली असे सांगून प्रश्न सुटणार आहे का? असा सवाल आ. विजय वडेट्टीवार यांनी उपस्थित केला. प्रशासनाने ' जनतेच्या संयमाचा अंत पाहू नका' आणखी एखादा निष्पाप जीव जाण्याची वाट पाहू नका. नागरिकांच्या जीविताची जबाबदारी शासनाने स्वीकारावी. तातडीने ठोस उपाययोजना न झाल्यास नागरिकांना सोबत घेऊन रस्त्यावर उतरु आणि कीव्र जनआंदोलन उभारु' असा स्पष्ट इशारा आ.विजय वडेट्टीवार यांनी दिला.

# सॉफ्टवेअरच्या चुकीचा फटका बळीराजाला !

## कोळवाडीचे शेतकरी अनुदान, पीक विम्यापासून वंचित राहण्याच्या भीतीने धास्तावले

**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.२४, पालम (परभणी) :** शासनाच्या विविध योजना, अनुदान तसेच पीक विम्याचा लाभ घेण्यासाठी ई-पीक पाहणीची नोंद महत्त्वाची असताना पालम तालुक्यातील मौजे कोळवाडी येथील शेतकऱ्यांना सॉफ्टवेअरमधील तांत्रिक अडचणीचा फटका बसत आहे. शेतातील पिकांची ई-पीक पाहणी करताना ऑनलाइन प्रणालीमध्ये शेताची दिशा चुकीची दाखवली जात असल्याने पाहणीची नोंद पूर्ण होत नसल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली आहे. या समस्येमुळे शासनाच्या विविध योजना, अनुदान तसेच पीक विम्याच्या लाभापासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाल्याने कोळवाडी येथील शेतकऱ्यांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. याबाबत शेतकऱ्यांनी २४ सप्टेंबर २०२६ रोजी पालम तहसीलदारांकडे निवेदन देऊन तातडीने समस्या सोडविण्याची मागणी केली.

निवेदनात शेतकऱ्यांनी म्हटले आहे की, त्यांच्या शेतातील पिकांची ई-पीक पाहणी करण्यासाठी ऑनलाइन प्रणालीचा वापर करताना शेताची दिशा चुकीची दाखवली जात आहे. त्यामुळे प्रत्यक्ष शेतात असलेल्या पिकांची योग्य नोंद सॉफ्टवेअरमध्ये करता येत नाही. तांत्रिक अडचणीमुळे ई-पीक पाहणी रखडल्याने त्याचा थेट परिणाम शेतकऱ्यांच्या शासकीय लाभांवर होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.



**तांत्रिक चुकीमुळे आर्थिक नुकसान होण्याची भीती**

यंदा पावसाच्या अनिश्चिततेमुळे शेतकरी आधीच अडचणीत असताना ई-पीक पाहणीची नोंदच झाली नाही तर भविष्यात पीक विमा, अनुदान अथवा शासनाच्या इतर योजनांचा लाभ घेताना अडचणी निर्माण होऊ शकतात. त्यामुळे सॉफ्टवेअरमधील तांत्रिक त्रुटीमुळे शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काच्या मदतीपासून वंचित राहावे लागू नये, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

**तातडीने तांत्रिक त्रुटी दूर करण्याची मागणी**

महसूल विभागाने तसेच संबंधित प्रशासनाने या समस्येची तातडीने दखल घेऊन ऑनलाइन प्रणालीतील शेताची चुकीची दिशा आणि इतर तांत्रिक त्रुटी दुरुस्त कराव्यात. ई-पीक पाहणी सुरळीतपणे करता यावी यासाठी आवश्यक ती कार्यवाही करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

या निवेदनावर अर्जदार विश्वांभर सुदाम मेकेवाड यांच्यासह बाबुराव रंगनाथ मेकेवाड, भास्कर किशनराव मेकेवाड, अंकुश अतेराम मेकेवाड, चक्रधर मुरलीधर जामोदेकर, थोराजी नारायण मेकेवाड, डिगांबर तुळशिराम एम्बेलवाड, मुरलीधर आबाजी मेकेवाड, मुरलीधर आबाबुवा जामोदेकर, सदाशिव नारायण मेकेवाड, सुदाम देवराव मेकेवाड, अनिल भास्कर मेकेवाड, जिवन बाबुराव मेकेवाड, दत्ता तुळशिराम एम्बेलवाड, प्रल्हाद अतेराम मेकेवाड, श्रीकांत यशवंतराव मेकेवाड यांच्यासह समस्त गावकरी मंडळाच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# अक्षराज






हर्षद मधुकर फौजदार, (यंदा वर्ष ४३ )(खार्डीगांव, पोस्ट डावले, ता. जिल्हा– ठाणे) यांचा घरचा गणपती बाप्पा




विकास बाळाराम आलिमकर (मु.शिळगांव, पो.पडले, ता. जिल्हा. ठाणे, शिळ –दिवा रोड.. ठाणे) यांचा घरचा गणपती बाप्पा




केशव काशिनाथ पावशे यंदा वर्ष ९२ (पेंधर गाव, पोस्ट तलोजा, तालुका पनवेल जिल्हा रायगड,) यांचा घरचा  गणपती बाप्पा




गणेश सोरखादे (भाल गाव श्री मलंग रोड कल्याण इस्ट जिल्हा ठाणे) यांच्या घरचा गणपती बाप्पा




प्रदीप दिनकर आलिमकर (मु.शिळगाव पोस्ट पडले ता.जि.ठाणे) यांचा घरचा गणपती बाप्पा




हेमंत रामचंद्र आलिमकर, कृष्णा इस्टेट परिवाराचा राजा, (मु. शिळगांव,पोस्ट पडले, ता.जि.ठाणे) यांचा घरचा गणपती बाप्पा




महेंद्र जाधव (पिंपरी गाव, पोस्ट दहिसर, तालुका जिल्हा ठाणे, नवी मुंबई) यांचा घरचा गणपती बाप्पा




हेमंत जिजाबाई राघोआंबेकर (डायघर गाव, ता.जि– ठाणे) यांचा घरचा गणपती बाप्पा




हरेश भरत पाटील, यंदा वर्ष ११वे, नवसाची गौराई (कोपरखैरणे गाव, नवी मुंबई) यांच्या घरच्या गौराई




रवींद्र पाटील (दहिसर गाव, तालुका जिल्हा ठाणे, नवी मुंबई ) यांचा घरचा बाप्पा




मनोहर चांगा काठे (मु.शिळगांव, पोस्ट पडले, ता.जि.ठाणे) यांच्या घरचा गणपती बाप्पा




योगेश पाटील (मु.डायघरगांव, पोस्ट पडले, ता.जि.ठाणे) यांचा घरचा गणपती बाप्पा




श्री.गणेश बेद्रे व सौ.रेशमा बेद्रे (आळंदी देवाची, पुणे) यांच्या घरातील गौरी गणेशाची विशेष सजावट




श्री.अर्जुन व सौ.वृषाली थोरात (आळंदी देवाची, पुणे) यांच्या घरातील गणेशाची विशेष सजावट




दिनेश कुंडलिक म्हात्रे यंदा वर्ष ३५ वे, (मु.खार्डीगांव, पोस्ट डावले, ता.जि.ठाणे) यांचा घरचा गणपती बाप्पा

अक्षराज



# ६१ किलोग्रॅम वजनाच्या गांजासह, स्कॉर्पिओ कार असा एकुण ४० लाख ६६ हजार रु. किंमतीचा मुद्देमाल जप्त

## स्थानिक गुन्हे शाखा, पुणे ग्रामीणची मोठी कारवाई



**अक्षराज : प्रमोद दिवेकर**

**दि.२४, शिरूर (पुणे) :** नशामुक्त भारत अभियानाचा व ड्रग्स फ्रि महाराष्ट्र या उपक्रमाची सुरूवात करणेत आलेली असून प्राधान्याने कारवाया करून नशामुक्त देश करण्याचे अनुषंगाने पुणे ग्रामीण हद्दीत अंमली पदार्थ तसेच तंबाखूजन्य पदार्थाची बेकायदेशीर रित्या विक्री अगर सेवन होवू नये. याकरीता विशेष पोलीस महानिरीक्षक, रंजनकुमार शर्मा सो कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर व संदीप सिंह गिल्ल, पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांनी अवैध व्यवसायांवरील कारवाईचा बडगा चालू ठेवत अवैधरित्या अंमली पदार्थ व तंबाखूजन्य पदार्थ विनापरवाना जवळ बाळगणारे विक्री करणारे व्यक्तींवर कारवाई करण्यासाठी पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर, स्थानिक गुन्हे शाखा यांना सूचना दिल्या होत्या. त्यानुसार अंमली पदार्थ व तंबाखुजन्य पदार्थ जवळ बाळगणारे विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेची पथके तयार करण्यात आली आहेत.त्या अनुषंगाने दिनांक २३ सप्टेंबर २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक गणपतीच्या अनुषंगाने शिरुर परिसरात गस्त करत असताना शिरूर पोलीस स्टेशन हद्दीत अंमली पदार्थाची बेकायदेशीर रित्या देवाण-घेवाण होणार असून खात्रीशीर माहिती काढून कायदेशीर कारवाई करावी, असे आदेश मा. पोलीस अधीक्षक श्री. संदीप सिंह गिल्ल सो. पुणे ग्रामीण, यांनी पथकाला दिले होते. स्था.गु.शा.चे पथकाने पोनि प्रमोद क्षीरसागर यांचे मार्गदर्शनाखाली माहिती काढत असताना पो.हवा. तुषार पंधारे, नेम. स्था.गु.शा. यांना त्यांचे गोपनीय बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, इसम नामे पोपट विठ्ठल शितोळे रा.इचकेवाडी, कवठे येमाई ता. शिरुर जि.पुणे हा त्याचे ताब्यात प्रतिबंधीत गांजा अंमली पदार्थ बाळगून त्याची विक्री करणेसाठी मोजे कवठे येमाई ता.शिरुर जि.पुणे येथील शिरुर ते मंचर जाणारे रोडचे बाजुला इचकेवाडी येथे आरोपी याने त्याचे राहते घराचे समोर पार्क केलेल्या पांढरे रंगाची स्कॉर्पीओ गाडी नं एम. एच १२ एच.झेड ०९३८ यामध्ये गांजा अंमली पदार्थ विक्री करण्यासाठी ठेवला आहे, अशी खात्रीशीर माहिती मिळाली, त्या माहितीचे अनुषंगाने पथकाने कायदेशीर तरतुदींची पुर्तता करत उपविभागीय पोलीस अधिकारी शिरुर उप विभाग शिरूर यांचे आदेश प्राप्त केले. छापा कारवाईचे सर्व साहीत्य व पंचांसह स्था. गु. शाखेच पथक कारवाई साठी रवाना झाले. मिळालेल्या बातमीचे ठिकाणी पथकाने जावून छापा कारवाई केली. कारवाई दरम्यान आरोपी पोपट विठ्ठल शितोळे वय ५२ वर्षे रा. इचकेवाडी, कवठे येमाई ता. शिरुर जि. पुणे यास ताब्यात घेण्यात आले. त्यांचे ताब्यात ६१ किलोग्रॅम वजनाचा गांजा अंमली पदार्थ, स्कॉर्पीओ गाडी नं एम.एच १२ एच.झेड ०९३८ असा ४०,६६,०००/- रू.चा मुद्देमाल मिळून आला आहे. त्याबाबत शिरुर पोलीस स्टेशन गु.र.नं. ८४४/२०२६ एनडीपीएस कायदा कलम ८ (क), २०(ब) (क) (ळळ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.तसेच पोलीस अधीक्षक, संदीप सिंह गिल्ल, सो. पुणे ग्रामीण, यांनी सर्व नागरिक आणि पालकांना नम्र आवाहन केले की, आपल्या जिल्ह्यातील युवा पिढीला अमली पदार्थाच्या प्राणघातक व्यसनापासून वाचवण्यासाठी पोलीस प्रशासन कटिबद्ध आहे. हे अवैध जाळे मुळापासून उखडून टाकण्यासाठी प्रत्येक नागरिकाची सतर्कता आणि सहभाग अत्यंत महत्वाचा आहे. आपल्या परिसरात अमली पदार्थांची विक्री किंवा वाहतूक करणाऱ्या गुन्हेगारांची माहिती देऊन कायदा व सुव्यवस्था राखण्यास मदत करा. माहिती देणाऱ्या नागरिकाची ओळख पूर्णपणे गुप्त ठेवली जाईल. कोणतीही भीती न बाळगता निर्भयपणे पुढाकार घ्या. आपली एक गुप्त माहिती एखाद्या तरुणाचे भविष्य आणि एका कुटुंबाचे आरोग्य सुरक्षित करू शकते. चला, अमली पदार्थमुक्त आणि सुरक्षित समाज घडवण्यात आपले योगदान द्या. असे सर्व नागरिकांना आवाहन केले आहे.सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल, सो. पुणे ग्रामीण, मा.अपर पोलीस अधीक्षक डॉ.शुभम कुमार, पुणे विभाग, उपविभागीय पोलीस अधिकारी रविंद्र भासले, शिरूर उपविभाग, यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर, स्था. गु.शा.चे पोसई महेश डोंगरे, स्था.गु.शा. चे पोलीस अंमलदार संजय पड्याळ, तुषार पंदारे, जनार्दन शेळके, संजू जाधव, राजु मोमीन, विकास पाटील, सागर धुमाळ, यांनी केली असून सदर गुन्हयाचा पुढील तपास शिरुर पोलीस स्टेशन हे करत आहेत.

# पोलीस निरीक्षक हर्षद गालिंदे ॲक्शन मोडवर

## महाबळेश्वरातील रस्त्यांवर वर्षानुवर्षे पडून असलेली जुनी, बंद वाहने हटवून जप्त; वाहतूक कोंडीला लगाम

**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.२४, महाबळेश्वर (सातारा) :** महाबळेश्वर शहरातील रस्त्यांच्या कडेला दीर्घकाळापासून बेवारस अवस्थेत उभी असलेली तसेच बंद पडलेली वाहने आता पोलिसांच्या रडारवर आली आहेत. वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या अशा वाहनांविरोधात पोलीस निरीक्षक हर्षद गालिंदे यांनी कडक कारवाई सुरू केली असून, अनेक जुनी व बंद वाहने हटवून पोलिसांनी ताब्यात घेतली आहेत.

शहरातील विविध भागांमध्ये रस्त्याच्या कडेला अनधिकृतपणे उभी असलेली वाहने वाहतुकीस अडथळा निर्माण करीत होती. त्यामुळे वाहनचालक, नागरिक तसेच महाबळेश्वरला येणाऱ्या पर्यटकांना अडचणींचा सामना करावा लागत होता. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी कारवाईची मोहीम हाती घेत रस्त्यांवरील अडथळे दूर करण्यास सुरुवात केली आहे.

दीर्घकाळ एकाच ठिकाणी पडून असलेली आणि वापरात नसलेली वाहने शहराच्या सौंदर्याला ही बाधा आणत होती. त्याचबरोबर अरुंद रस्त्यांवर अशा वाहनांमुळे वाहतुकीची कोंडी होण्याची शक्यता निर्माण होत होती. पोलिसांच्या कारवाईमुळे अनेक रस्ते मोकळे होण्यास सुरुवात झाली आहे.



वाहतूक सुरळीत ठेवणे, नागरिकांची गैरसोय टाळणे आणि पर्यटकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्यासाठी पोलीस प्रशासनाने कडक भूमिका घेतली आहे. रस्त्यांवर वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या वाहनांबाबत यापुढेही कारवाई सुरू राहण्याचे संकेत पोलिसांकडून देण्यात आले आहेत. महाबळेश्वर शहरातील रस्ते अडथळामुक्त करण्याच्या या कारवाईमुळे वाहतूक शिस्तीला चालना मिळणार आहे पोलीस निरक्षक हर्षद गालिंदे यांच्या या धडक कारवाई मुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# विधवा महिलेच्या घराला २५ हजार ६२० रुपयांचे वीज बिल

## महावितरणच्या कारभारावर संताप; महिलेची आमदार निकोले यांच्याकडे धाव

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.२४, डहाणू (पालघर) :** महावितरणच्या स्मार्ट मीटरसह वाढीव वीज बिलांच्या तक्रारींमुळे सर्वसामान्य वीज ग्राहक त्रस्त असतानाच डहाणू तालुक्यातील कैनाड येथील एका गरीब विधवा महिलेच्या घराला तब्बल २५ हजार ६२० रुपयांचे वीज बिल आल्याचा प्रकार समोर आला आहे. सुमती बाळू गवळी या महिलेची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असून, एवढ्या मोठ्या रकमेचे वीज बिल आल्याने त्यांच्या कुटुंबापुढे मोठा आर्थिक प्रश्न निर्माण झाला आहे. या प्रकरणी संबंधित महिलेने डहाणू विधानसभा आमदार कॉ. विनोद निकोले यांच्याकडे धाव घेतली आहे.

पालघर जिल्ह्यात वाढीव वीज बिल, स्मार्ट मीटर, वीजपुरवठ्यातील समस्या आणि महावितरणच्या कार्यपद्धतीबाबत नागरिकांकडून सातत्याने तक्रारी केल्या जात आहेत. या प्रश्नावर भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) पक्षाच्या वतीने यापूर्वी आंदोलन, मोर्चे तसेच रास्ता रोको करण्यात आले आहेत.



महावितरणकडून ग्राहकांच्या तक्रारींची दखल घेऊन वीज बिलांच्या समस्यांवर योग्य कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले जाते; मात्र प्रत्यक्षात अपेक्षित सुधारणा होत नसल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे.

वाढीव वीज बिल आणि स्मार्ट मीटरच्या प्रश्नावर दि.१० सप्टेंबर २०२६ रोजी भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) यांच्या वतीने डहाणू विधानसभा आमदार कॉ.विनोद निकोले यांच्या नेतृत्वाखाली हायवे रोको आंदोलन करण्यात आले होते.

या आंदोलनाच्या माध्यमातून सर्वसामान्य ग्राहकांना येणारी अवाजवी वीज बिले, स्मार्ट मीटर तसेच महावितरणशी संबंधित विविध समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले होते.

मात्र, आंदोलन होऊन काही दिवस उलटत नाहीत तोच दि. २४ सप्टेंबर २०२६ रोजी कैनाड येथील सुमती बाळू गवळी या विधवा महिलेच्या घराला तब्बल ₹२५,६२० इतके वीज बिल आल्याचे समोर आले आहे.

त्यामुळे आंदोलनानंतरही ग्राहकांच्या तक्रारी कायम असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. सुमती गवळी यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने एवढ्या मोठ्या रकमेचे वीज बिल भरणे त्यांच्या आवाक्याबाहेर असल्याचे सांगण्यात येत आहे.

त्यामुळे महावितरणने या बिलाची तातडीने चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. संबंधित ग्राहकाच्या घरातील मीटर रीडिंग, मागील काही महिन्यांतील वीज वापर, सध्याच्या बिलातील युनिटची नोंद, बिलाची गणना आणि मीटरची अचूकता यांची पडताळणी करावी. बिलामध्ये कोणतीही तांत्रिक अथवा मानवी त्रुटी आढळल्यास ते तातडीने दुरुस्त करून योग्य बिल देण्यात यावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

**‘गरीब कुटुंबांना एवढे बिल भरणे शक्य नाही’**

आधीच गरीब कुटुंबांना दोन वेळच्या जेवणाची भ्रांत असताना हजारो रुपयांचे वीज बिल भरणे शक्य नाही. महावितरणने अशा प्रकरणांकडे संवेदनशीलतेने पाहून तातडीने बिलाची चौकशी करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात आली आहे. दरम्यान, दि.१० सप्टेंबर च्या हायवे रोको आंदोलनानंतरही सर्वसामान्य ग्राहकांना अशा प्रकारे मोठ्या रकमेची वीज बिले मिळत असतील, तर महावितरणच्या बिलिंग प्रक्रियेबाबत प्रश्न उपस्थित होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे सुमती गवळी यांच्या वीज बिलाची तातडीने चौकशी करून त्यांना दिलासा द्यावा, तसेच बिल योग्य असल्यास त्यामागील कारण स्पष्ट करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

# थोडक्यात बातम्या

## महाराष्ट्र रत्न पुरस्कारासाठी सुवर्णा पाटील यांची निवड



**अक्षराज : पूनम परदेशी**

**दि.२४, सोयगाव (छ.संभाजीनगर) :** सोयगाव तालुक्यातील घोसला ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच सौ. सुवर्णा ज्ञानेश्वर पाटील यांची राज्यस्तरीय ‘महाराष्ट्र रत्न गुणगौरव सन्मान पुरस्कार २०२६’ साठी निवड झाली आहे. नालंदा ऑर्गनायझेशन (पुणे) यांच्या सर्वेक्षणातून त्यांच्या लोकोपयोगी कामांची तसेच ग्रामविकासातील योगदानाची दखल घेत हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य आणि ग्रामविकास क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा नालंदा ऑर्गनायझेशनच्या वतीने राज्यस्तरावर गौरव केला जातो. सरपंच पदाच्या कार्यकाळात सौ.पाटील यांनी गावातील विविध विकासकामे, महिला सक्षमीकरणाचे उपक्रम तसेच लोकाभिमुख कारभाराला प्राधान्य दिले. त्यांच्या या कार्याची दखल घेत निवड समितीने त्यांची पुरस्कारासाठी निवड केली.

**पुण्यात होणार पुरस्कार वितरण**

‘महाराष्ट्ररत्न गुणगौरव सन्मान पुरस्कार २०२६’चा वितरण सोहळा रविवार, दिनांक २७ सप्टेंबर रोजी पुणे येथील पत्रकार भवन, नवी पेठ येथे होणार आहे. या सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते सुवर्णा पाटील यांना पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल घोसला परिसरासह सोयगाव तालुक्यातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

## चिमूरच्या निवासी शाळेची विभागीय स्पर्धेत दणदणीत बाजी




**अक्षराज : नितीन पाटील**

**दि.२४, चिमूर (चंद्रपूर) :** राष्ट्रीय लोकसंख्या शिक्षण प्रकल्प २०२६ - २७ अंतर्गत आयोजित नागपूर विभागस्तरीय भूमिका अभिनय स्पर्धेत पी.एम.श्री अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलींची शासकीय निवासी शाळा, चिमूर यांनी उल्लेखनीय यश संपादन करत प्रथम क्रमांक पटकावला आहे. या दमदार कामगिरीमुळे शाळेची राज्यस्तरीय भूमिका अभिनय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. नैतिक मूल्यांवर आधारित विषयाचे प्रभावी सादरीकरण करत शाळेच्या विद्यार्थिनी कु.बोदीक्षा गायकवाड, कु.प्रांजली अवथरे, कु.तन्वी बारेकर, कु. अनुराधा गेडाम आणि कु. सोनाक्षी गणवीर यांनी आपल्या अभिनयाची प्रभावी छाप पाडली. विषयाची मांडणी, संवादफेक, अभिनयातील आत्मविश्वास, सादरीकरणातील समन्वय आणि सामाजिक संदेश यामुळे त्यांच्या सादरीकरणाला विभागस्तरावर प्रथम क्रमांक मिळाला.

**अभिनयातून सामाजिक संदेश; चिमूरच्या लेकींची राज्यस्तरावर धडक**

या यशाबद्दल समाजकल्याण विभागाच्या आयुक्त दीपाताई मुधोळ, नागपूर प्रादेशिक विभागाचे उपायुक्त प्रसाद कुलकर्णी, शिक्षण विभाग मुंबईचे शिक्षण उपसंचालक डोर्लीकर, सहायक आयुक्त समाजकल्याण चंद्रपूर विनोद मोहतुरे, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (DIET), चंद्रपूरचे प्राचार्य विनय मत्ते तसेच चिमूरचे गटशिक्षणाधिकारी विशाल बोधाने यांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन करून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती सुनिता खोब्रागडे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच श्रीमती प्रिया बोरकर, विनय खापर्डे, दत्तात्रय पुलेनवार, राजरत्न गजभिये, सचिन भरडे आणि पंकज काळे यांच्या सहकार्याने विद्यार्थिनींनी स्पर्धेची तयारी केली.

**चिमूरच्या शैक्षणिक क्षेत्रात अभिमानाचा क्षण**

विभागस्तरीय स्पर्धेत मिळविलेल्या या यशामुळे चिमूरच्या निवासी शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेसोबतच विद्यार्थिनींच्या कलागुणांना, सामाजिक जाणीवांना आणि व्यक्तिमत्त्व विकासाला मिळणाऱ्या प्रोत्साहनाची झलक पुन्हा एकदा समोर आली आहे. आता या गुणवंत विद्यार्थिनी राज्यस्तरीय भूमिका अभिनय स्पर्धेत नागपूर विभागाचे प्रतिनिधित्व करणार असून, त्यांच्या पुढील यशस्वी वाटचालीसाठी शाळा प्रशासन, शिक्षकवृंद, बाह्य स्रोत कर्मचारी, अधिकारी आणि नागरिकांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## वेटलिफ्टिंग स्पर्धेत महाराष्ट्र विद्यालयाचे वर्चस्व कायम



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२४, नागपूर :** तनिष्क कॉलेज ऑफ नर्सिंग राजीव नगर नागपूर येथे संपन्न झालेल्या शालेय जिल्हास्तरीय वेटलिफ्टींग स्पर्धेतखापरखेडा येथील महाराष्ट्र विद्यालयातील ज्युदोपटूंनी स्पृहणीय कामगिरी करून आपापल्या वयोगट व वजनगटामध्ये प्रथम क्रमांक पटकावून सुवर्णपदक प्राप्त करुन वर्चस्व कायम ठेवले.

१७ वर्ष वयोगटात मुलींमध्ये ६३ किलो खालील महिमा थुलकर प्रथम,
७७ किलो खालील पलक थुलकर प्रथम,
१९ वर्ष वयोगटात मुलींमध्ये
५८ किलो खालील म्रुणाली ठाकरे प्रथम,
१९ वर्ष वयोगटात मुलांमध्ये
६० किलो खालील नैतिक गौरखेडे प्रथम,
६५ किलो खालील मंथन ढोके प्रथम,
७९ किलो खालील स्वरीत गौरखेडे प्रथम,
९८ किलो खालील आदित्य वारकर प्रथम,
११० किलो वरील रेहान पाटिल प्रथम,

तर श्रुती बावणे, हर्षीता मेश्राम, शंतनु ओकटे,प्रसिन मडके व पार्थ धिरडे यांना मात्र व्दितीय क्रमांकावर समाधान मानावे लागले. वरील सर्व प्राविण्य प्राप्त खेळाडूंना क्रीडाशिक्षक धैर्यशील सुटे यांचे मार्गदर्शन लाभले. नागपूर येथे होणाऱ्या शालेय विभागीय वेटलिफ्टींग स्पर्धेत नागपूर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करतील.महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्थेचे मार्गदर्शक व विश्वस्त सुनिलभाऊ केदार, अध्यक्ष सुधीर केदार, विद्यालयाचे मुख्याध्यापक अरुण वडस्कर, उपमुख्याध्यापक जितेंद्र ठाकरे, पर्यवेक्षक नरेंद्र माहूरतळे, क्रीडा शिक्षक धैर्यशील सुटे, धर्मेंद्र सूर्यवंशी, सर्व शिक्षक वृंद व कर्मचारी वर्ग यांनी विजयी वेटलिफ्टरचे अभिनंदन केले.

अक्षराज



## थोडक्यात बातम्या

## लोकमान्यनगर - शास्त्रीनगरचा 'निर्धार मेळावा'; पुनर्विकासाच्या प्रश्नावर रविवारी शक्तिप्रदर्शन




**अक्षराज : विकास दळवी**

**दि.२४, ठाणे :** वर्षानुवर्षे पुनर्विकासाच्या प्रतीक्षेत असलेल्या लोकमान्यनगर – शास्त्रीनगर परिसरातील रहिवाशांच्या घरांचा प्रश्न आता पुन्हा ऐरणीवर आला आहे. हक्काची घरे, परिसराचा सर्वांगीण विकास आणि पुनर्विकास प्रक्रियेला गती देण्याच्यासाठी सभागृह नेते हणमंत जगदाळे यांच्या माध्यमातून रविवार, दिनांक २७ सप्टेंबर रोजी लोकमान्य–शास्त्रीनगर विभागातील लोकांचा कोरस रोड येथे सायंकाळी ६ वाजता 'निर्धार मेळावा' आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यातून उपस्थित नागरीकांच्या माध्यमातून क्लस्टरद्वारे पुनर्विकास व सर्वागीण विकसनशील वाटचालीसाठी एकजुटीचा निर्धार व्यक्त केला जाणार आहे. पुनर्विकास, रींग मेट्रो आणि डीपी रोडच्या प्रश्नावर स्थानिक पातळीवर राजकीय हस्तक्षेप आणि कुरघोडीचे प्रयत्न होत असल्याचा आरोप रहिवाशांकडून करण्यात येत आहे. या संदर्भात शिवसेनेच्याच दोन गटाकडून घेतलेल्या भूमिकेमुळे राजकीय वातावरण तापले होते. त्यानंतर आता पुनर्विकासाच्या मुद्द्यावर पुन्हा एकदा या निर्धार मेळाव्याच्या पाश्वभूमीवर राजकीय वादाची चर्चा सुरू झाल्याचे दिसून येत आहे.'घराचा प्रश्न राजकारणापलीकडे'लोकमान्यनगर–शास्त्रीनगर परिसरातील नागरिकांच्या म्हणण्यानुसार, पुनर्विकास हा कोणत्याही पक्षाचा राजकीय मुद्दा नसून हजारो कुटुंबांच्या भवितव्याशी निगडित प्रश्न आहे. त्यामुळे नियोजित मार्गाने पुनर्विकास प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करून रहिवाशांना सुरक्षित, सुसज्ज आणि आधुनिक घरांचा लाभ मिळावा, अशी प्रमुख मागणी आहे.या पार्श्वभूमीवर स्थानिक शिवसेना लोकप्रतिनिधी व पदाधिकाऱ्यांच्या पुढाकारातून रहिवाशांचा निर्धार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. मेळाव्याला विविध राजकीय पक्षांचे स्थानिक नेते, लोकप्रतिनिधी तसेच सामाजिक कार्यकर्ते उपस्थित राहण्याची शक्यता आहे. लोकमान्यनगरातील प्रस्तावित पुनर्विकासाबरोबरच रिंग मेट्रो प्रकल्प, डीपी रोड आणि परिसरातील वाहतूक व नागरी सुविधांचे प्रश्न यावरही मेळाव्यात चर्चा होण्याची शक्यता आहे. लोकमान्यनगरातील हजारो कुटुंबांची घरे उद्धवस्त करण्याची वेळ येऊ नये, यासाठी पुनर्विकासाची प्रक्रिया ठोस नियोजनातून मार्गी लावावी, अशी भूमिका रहिवाशांकडून मांडली जात आहे. बुधवारी सिद्धेश्वर तलाव खोपट येथील महत्त्वाकांक्षी क्लस्टर पुनर्विकास प्रकल्पाचा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. त्यामुळे आगामी काळात शहरातील विविध भागांतील पुनर्विकासाच्या प्रश्नांवर राजकीय वातावरण अधिक सक्रिय होण्याची शक्यता आहे.या पार्श्वभूमीवरआता प्रश्न केवळ पुनर्विकासाचा नाही; तर हजारो कुटुंबांच्या हक्काच्या घरांचा आहे. त्यामुळे २७ सप्टेंबरचा 'निर्धार मेळावा' लोकमान्यनगर – शास्त्रीनगरच्या पुनर्विकासाच्या लढ्याला कोणती दिशा देतो, याकडे परिसराचे लक्ष लागले आहे.

## कोकणातील गरुडेश्वर कला मंचच्या प्रतिष्ठित कलाश्री पुरस्काराने केजचे रोहन वेदपाठक सन्मानीत




**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.२४, केज (बीड) :** कोकणातील गरुडेश्वर कला मंच यांच्या तर्फे प्रतिवर्षी दिला जाणारा प्रतिष्ठित कलाश्री पुरस्कार यावर्षी केज येथील कन्हैय्या ग्रुपचे प्रमुख रोहन वेदपाठक यांना प्रदान करण्यात आला. रोहन वेदपाठक हे कन्हैय्या ग्रुपच्या माध्यमातून सामाजिक क्षेत्रात लोकांच्या कला गुणांना वाव मिळावा म्हणून विविध कार्यक्रमाचे आयोजन केज शहरात व ग्रामिण भागात करत असतात. गौरी–गणपती सजावट स्पर्धा, नवरात्रोत्सवात दांडिया महोत्सव, दहिहंडी उत्सव, श्रीकृष्ण वेशभूषा, दिव्यांग बांधवासाठी कला प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करतात. यामुळे शहर व ग्रामीण भागातील महिला पुरुष या कला जोपासणाऱ्या उपक्रमांमध्ये मोठया संख्येने सहभागी होतात.त्यांच्या या कला क्षेत्रातील योगदानाची नोंद घेवून कोकणातील गरुडेश्वर कला मंच यांच्या तर्फे रायगड येथे गणेशोत्सवादरम्यान त्यांचा कलाश्री पुरस्काराने सन्मान करण्यात आला. त्यांना मिळालेल्या या पुरस्कारामुळे केज शहरातील नागरीकांनी व थोरामोठ्यांनी त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला आहे. त्यांना मिळालेला कलाश्री पुरस्कार त्यांनी सदगुरू श्री. वासुदेव खंदारे गुरुजींच्या चरणी समर्पित केला आहे.

## कर्जतमध्ये स्वच्छता दूतांचा गौरव; निकेश फाळे टीमचा सन्मान




**अक्षराज : जयेश जाधव**

**दि.२४, कर्जत (रायगड) :** सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, कर्जत यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सत्कार समारंभात शहरातील स्वच्छता व्यवस्थेत योगदान देणारे मुकादम निकेश फाळे व त्यांच्या स्वच्छता पथकाचा 'स्वच्छता दूत' म्हणून गौरव करण्यात आला. कर्जत–खालापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते निकेश फाळे व त्यांच्या टीमचा सन्मान करण्यात आला. गणेशोत्सवाच्या काळात शहरातील स्वच्छता व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी स्वच्छता कर्मचाऱ्यांकडून करण्यात आलेल्या कार्याची दखल घेत हा गौरव करण्यात आला. याप्रसंगी विश्व्दीप रणदिवे आकाश परदेशी, श्रीकांत वाघेला ,सुरज वाघेला, दिनेश भालेराव, राहुल गायकवाड आदी कर्जत नगरपरिषदेतील स्वच्छता कर्मचारी उपस्थित होते. गणेशोत्सव हा श्रद्धा, उत्साह आणि सामाजिक एकोप्याचा उत्सव असून, उत्सव काळात स्वच्छ व सुंदर परिसर राखण्यासाठी स्वच्छता कर्मचाऱ्यांचे योगदान महत्त्वाचे ठरते. त्यांच्या कार्याचा सन्मान झाल्याने स्वच्छता पथकातील कर्मचाऱ्यांमध्येही उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.यावेळी नगरसेवक विजय हजारे, संकेत भासे, नगरसेवक रोहित ओसवाल, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

## सांडपाण्याच्या दुर्गंधीने नागरिक त्रस्त; चेंबर चोकअप चा कायमस्वरूपी तोडगा कधी?

### माथेरानमध्ये रेस्टॉरंटच्या सांडपाण्याचा प्रश्न ऐरणीवर सुयोग रेस्टॉरंट समोर घान पाणी साचल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर

**अक्षराज : चंद्राकांत सुतार**

**दि.२४, माथेरान :** माथेरान शहरातील काही भागांमध्ये रेस्टॉरंट आणि हॉटेलच्या किचनमधून वाहून जाणाऱ्या सांडपाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असल्याची तक्रार नागरिकांकडून करण्यात येत आहे. कमी व्यासाच्या पाईपमधून किचनमधील सांडपाण्यासोबत उष्टे अन्न, खरकटे पदार्थ तसेच वाट्या–चमचेही चेंबरमध्ये जात असल्याने वारंवार चेंबर चोकअप होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. परिणामी दुर्गंधीयुक्त सांडपाणी रस्त्यावरून वाहत असून नागरिकांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे.

मेजवानी रेस्टॉरंट, मोरया रेस्टॉरंट आणि शेलार उपहारगृह या परिसरातील किचनचे सांडपाणी एका चेंबरमधून वाहत असल्याचे सांगण्यात येते. या सांडपाण्यासोबत अन्नपदार्थ व इतर कचरा चेंबरमध्ये जात असल्याने



ते वारंवार तुंबते. चेंबर तुंबल्यानंतर हे सांडपाणी सुयोग रेस्टॉरंटसमोरून रस्त्यावर वाहत असल्याने परिसरात दुर्गंधी पसरत असल्याची तक्रार आहे.या परिस्थितीचा परिणाम सुयोग रेस्टॉरंटच्या व्यवसायावरही होत असल्याचे मालक सुहासिनी शिंदे यांनी सांगितले. दुर्गंधीमुळे पर्यटक रेस्टॉरंटमध्ये येण्यास टाळाटाळ करत असल्याचा त्यांचा दावा आहे. विशेष म्हणजे सध्या गणेशोत्सव सुरू असून सुयोग रेस्टॉरंटमध्ये दरवर्षी श्री गणेशाची प्रतिष्ठापना केली जाते. गणपतीची स्थापना झाल्यानंतरही रेस्टॉरंटच्या प्रवेशद्वारासमोरून सांडपाणी वाहत असल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

मेजवानी हॉटेल सुरू झाल्यापासून गेल्या दोन वर्षांपासून हा त्रास सुरू आहे. मेजवानी, शेलार आणि मोरया या हॉटेलचे पाणी या चेंबरमध्ये सोडले जाते. भात आणि इतर खरकटे पदार्थ न काढता पाणी थेट चेंबरमध्ये सोडल्याने चेंबर वारंवार चोकअप होते. तक्रार केल्यानंतर पालिकेचे कर्मचारी येऊन तात्पुरती साफसफाई करतात; मात्र कायमस्वरूपी उपाययोजना होत नाही. आमच्या आळीमध्ये लहान मुले आणि नागरिक राहतात. गणपती बाप्पांची स्थापना झाल्याच्या पहिल्याच दिवशी दुर्गंधीयुक्त पाणी वाहू लागले. समोर बाप्पा बसलेले असताना अशाप्रकारे घाण पाणी वाहणे योग्य नाही. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशी मागणी सुयोग रेस्टॉरंटच्या मालक सुहासिनी शिंदे यांनी केली.

दरम्यान, नागरिकांच्या म्हणण्यानुसार पालिकेकडून चेंबरची तात्पुरती साफसफाई केली जाते; मात्र काही दिवसांनी पुन्हा परिस्थिती जैसे थे होत आहे. त्यामुळे केवळ तात्पुरती साफसफाई न करता सांडपाणी वाहून नेण्यासाठी योग्य क्षमतेची व्यवस्था, चेंबरची रचना आणि कचरा व्यवस्थापन याबाबत कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

नगरपरिषद प्रशासन तसेच संबंधित लोकप्रतिनिधींनी या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन नागरिकांना मूलभूत स्वच्छता सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे. विशेषतः आरोग्य सभापतींनी या समस्येची पाहणी करून तातडीने उपाययोजना करावी, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

## जिंतूर तालुक्यात दुष्काळाची दाहकता

### भांबळेंचा शेतकऱ्यांच्या बांधावर पाहणी दौरा; सोयाबीन, कापूस, तुरीसह खरीप पिकांचे मोठे नुकसान

**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.२४, जिंतूर (परभणी) :** पावसाने दिलेल्या प्रदीर्घ खंडामुळे जिंतूर तालुक्यातील खरीप हंगाम संकटात सापडला असून अनेक भागांत सोयाबीन, कापूस, तूर यासह विविध पिके अक्षरशः करपून गेली आहेत. हातातोंडाशी आलेला खरीप हंगाम पावसाअभावी वाया जाण्याची भीती निर्माण झाल्याने शेतकरी आर्थिक विवंचनेत सापडला आहे. या पार्श्वभूमीवर मा. आ. विजयराव भांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवार, दि.२४ सप्टेंबर रोजी रायखेडा परिसरात शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली.

दुपारी १२.३० वाजता झालेल्या या पाहणी दौऱ्यात पिकांची सद्यस्थिती, पावसाच्या खंडामुळे झालेली हानी आणि शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेण्यात आल्या. अनेक शेतांमध्ये पिकांची वाढ खुंटलेली असून पाण्याअभावी पिके करपल्याचे चित्र पाहायला मिळाले. यावेळी संकटग्रस्त शेतकऱ्यांनी आपल्या व्यथा मांडत शासनाने तातडीने पंचनामे करून आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी केली.

**शेतकरी संकटात; शासनाने तातडीने निर्णय घ्यावा**

यावेळी माजी आ. विजयराव भांबळे यांनी जिंतूर तालुक्यातील दुष्काळी परिस्थिती गंभीर असल्याचे सांगत शासनाने विलंब न करता शेतकऱ्यांना मदत करण्याची मागणी केली. जिंतूर तालुक्यातील शेतकरी सध्या मोठ्या संकटात सापडला आहे. पावसाच्या खंडामुळे खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडले आहे.

या परिस्थितीची सविस्तर माहिती शासनाच्या निदर्शनास आणून देऊ, असे त्यांनी सांगितले.तालुक्यात तात्काळ दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना हेक्टरी



५० हजार रुपये, तर फळबागांसाठी हेक्टरी १ लाख रुपये भरीव मदत देण्यात यावी. तसेच पशुधनासाठी चारा छावण्या सुरू कराव्यात, नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, पीक विम्याचा लाभ मिळवून द्यावा आणि मागील वर्षाचा प्रलंबित पीक विमा शेतकऱ्यांना तातडीने मिळावा, अशी मागणी त्यांनी केली.

दुष्काळी परिस्थितीत शासनाकडून मिळणाऱ्या सर्व सवलती व सुविधा शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्याची मागणी करत शेतकऱ्यांना न्याय आणि भरीव मदत मिळेपर्यंत आमचा लढा सुरूच राहील, असा इशारा भांबळे यांनी दिला.या पाहणी दौऱ्याला ता.अ.लक्ष्मणराव बुधवंत, माजी जि.प. सदस्य विश्वनाथ राठोड, मुरलीधर मते, विठ्ठलराव घोगरे, पं.स. सदस्य अविनाश मस्के यांच्यासह देऊ राठोड, मांगीलाल राठोड, दिनकर दहिभाते, फत्तुसिंग पवार, अशोक प्रधान, नामदेव तुपसुंदर, परमेश्वर मुधवर, हकीम लाला, संग्राम पिंपळकर, सुंदर तीर्थे तसेच परिसरातील शेतकरी, स्थानिक लोकप्रतिनिधी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महिनाभर जनसेवेचा महायज्ञ; ठाणे जिल्ह्यात 'सेवा संकल्प' अभियान

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२४, ठाणे :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संविधानिक पदावरील २५ वर्षांच्या कारकीर्दीनिमित्त आणि त्यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून राज्यभर १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येणार आहे. ठाणे जिल्ह्यात हे अभियान प्रभावीपणे तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी सर्वसमावेशक आदेश जारी करून तालुकास्तरावर नोडल व पर्यवेक्षण अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे.

'सेवा परमोधर्म' या संकल्पनेवर आधारित या अभियानाचा उद्देश शासकीय योजनांचा लाभ एकाच छताखाली नागरिकांपर्यंत पोहोचविणे आणि प्रशासकीय कामांना गती देणे हा आहे. यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात 'सेवा सेतू अभियान' अंतर्गत विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. 'आपले सरकार सेवा केंद्रा'च्या माध्यमातून विविध अर्जांची पूर्तता करून जागेवरच सेवांचा लाभ देण्यात येणार आहे. तसेच महसूल व वन विभागाच्या पुढाकारातून प्रत्येक तालुक्यात 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर' आयोजित करण्यात येणार आहे.

अभियानात प्रलंबित फेरफार नोंदींचा निपटारा, सातबारा व ८–अ उताऱ्यांच्या नोंदी अद्ययावत करणे, गावठाणातील नागरिकांना स्वामित्व सनद वितरण, शिधापत्रिका वाटप, जन्म–मृत्यू व विवाह प्रमाणपत्रे, नॉन–क्रिमीलेअर, दिव्यांग व ज्येष्ठ नागरिक प्रमाणपत्रे, शिकाऊ वाहन परवाना, मालमत्ता हस्तांतरण, नळ व वीज जोडणीसह विविध सेवा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

वन हक्क दाव्यांच्या प्रकरणांनाही अभियानात प्राधान्य देण्यात आले असून ग्राम, तालुका आणि जिल्हास्तरीय समित्यांच्या माध्यमातून प्रलंबित तसेच नव्याने प्राप्त दाव्यांची पडताळणी व मंजुरी प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

याशिवाय युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि विविध मान्यवरांच्या सहभागातून स्वच्छता मोहिमा, रक्तदान शिबिरे, वृक्षारोपण, आरोग्य तपासणी, सायबर सुरक्षा व मतदार जनजागृती उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. शाळांमध्ये 'विकसित भारत–२०४७' विषयावरील चित्रकला व वक्तृत्व स्पर्धा, अंगणवाडी उत्सव तसेच पथनाट्यांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येणार आहे. युवा वर्गासाठी 'इनोव्हेशन चॅलेंज' स्पर्धा आणि शासकीय योजनांमुळे लाभलेल्या नागरिकांच्या 'बदलाची गोष्ट' या यशोगाथाही संकलित केल्या जाणार आहेत.

जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती संपूर्ण अभियानावर देखरेख ठेवणार असून जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी रणजीत यादव यांनीही नागरिकांना या उपक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. ग्रामीण व शहरी भागातील शेतकरी, विद्यार्थी, महिला आणि पात्र लाभार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे प्रशासनाने म्हटले आहे.

## विना परवाना अवैध गौण खनिज वाहतूक करणारे ३ ट्रॅक्टर तहसील कार्यालयात जमा

**अक्षराज : नंदकुमार बोरसे**

**दि.२४, शिरपूर (धुळे) :** शिरपूर तालुक्यात दि.२४ सप्टेंबर २०२६ उपविभागीय अधिकारी, शिरपूर, तहसीलदार, शिरपूर व मा. नायब तहसीलदार यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभागाच्या पथकाने लोंढरे शिरपूर नदीपात्रात दि.२४ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी सुमारे १.०० वाजता विना परवाना अवैध गौण खनिज वाहतूक करणाऱ्या ३ ट्रॅक्टरवर कारवाई केली. सदर कारवाईदरम्यान अवैध गौण खनिज वाहतूक करणारे ३ ट्रॅक्टर ताब्यात घेऊन पुढील कार्यवाहीसाठी तहसील कार्यालय, शिरपूर येथे जमा करण्यात आले.

या कार्यवाहीच्या पथकात महेश साळुंके रावसाहेब, मंडळ अधिकारी महेंद्र पाटील, मंडळ अधिकारी मनीषा ठाकरे, मंडळ अधिकारी पंकज महाले, ए.आर राजपूत, दीपक पाटील, विजय बोरसे, जयेश साळुंखे, अर्जुन पवार, संदीप महाजन, शुभम रामटेके, रजनीकांत कांगुणे, रविना गिरासे, चेतना चौरे, रावसाहेब



शिरसाठ व पोलिस कर्मचारी.

महसूल विभागाच्या या कारवाईमुळे विना परवाना गौण खनिज वाहतूक करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून, अशा प्रकारची अवैध वाहतूक आढळल्यास कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.